वरिष्ठ पोलीस निरीक्षक,खंडणी विरोधी पथक,
पिंपरी चिंचवड आयुक्तालय
पत्ता- भुजबळ चौक, वाकड पोलीस चौकी शेजारी, वाकड पुणे
ई-मेल आयडी – piaec.pcpc-mh@mahapolice.gov.in

**प्रेसनोट दिनांक ०४/०८/२०२२**

## खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा यांची कामगिरी

## खुनाचा प्रयत्नच्या गुन्हयात ६ महीन्यापासुन पाहीजे असलेल्या आरोपीस गावठी कट्टयसह अटक

मा. पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड यांनी दिलेल्या अदेशाप्रमाणे व वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या सुचनां प्रमाणे, खंडणी विरोधी पथका कडील अंमलदार पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पाहिजे, फरारी व तडीपार तसेच दहशत करुन खंडणी उकळणाऱ्या आरोपींतांची माहिती काढण्यासाठी दि.०३/०८/२०२२ रोजी शिरगाव पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना, कुसगाव धरणाजवळ आले असता, **पोलीस नाईक अशिष बोटके व पोलीस नाईक गणेश गिरीगोसावी** यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, शेवगाव, अहमदनगर येथे पिस्टल मधुन फायरींग करुन खुनाचा प्रयत्न केल्याचे गुन्हयातील पाहीजे असलेला आरोपी सचिन राठोड हा के रॉक्स हॉटेलचे पाठीमागे धरणाजवळ, कुसगाव, ता.मावळ पुणे येथे थांबलेला असुन, त्याचे जवळ पिस्टल आहे. अशी माहीती मिळाली सदरची बातमी खंडणी विरोधी पथकाचे प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय जोगदंड यांनी खंडणी विरोधी पथकातील स्टाफला सदर ठिकाणी जावुन, बातमी प्रमाणे खात्री करून, कारवाई करणेबाबत तोंडी आदेश दिल्याने सदर ठिकाणी गुन्हे शाखेचे सहा पोलीस उपनिरक्षक अमर राऊत पोलीस नाईक अशिष बोटके ,पोलीस नाईक गणेश गिरीगोसावी, पोलीस नाईक विजय नलगे यांचे पथका सह कुसगाव धरण परिसरात सापळा लावुन बातमी प्रमाणे खात्री करीत असता सदरचा इसम पळुन जावु लागल्याने त्यास वरील पथकाने पाठलाग करुन थोडया अंतरावरच ताब्यात घेवुन त्याचेकडे चौकशी केली असता त्याने त्याचे नाव सचिन सुभाष राठोड, वय-२२ वर्षे, रा. केदारी यांचे खोलीत, के रॉक्स हॉटेलजवळ, कुसगाव ता. मावळ जि.पुणे असे असल्याचे सांगितले त्यावेळी त्याची अंगझडती घेतली असता त्याचे पॅन्टचे डावे बाजुस शर्टाचे खाली कमरेमध्ये ४०,२०० रु किंमतीचे एक देशी बनावटीचे पिस्टल व मॅगझिन मध्ये ०१ जिवंत काडतुस (रांऊड) भरलेले मिळुन आले. त्याचे कडुन ते जत्प करण्यात आले असुन त्याचे विरुध्द शिरगाव पोलीस स्टेशन येथे गुरनं २६/२०२२ आर्म ॲक्ट कलम ३(२५) महा.पो अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**सदरचा आरोपी हा जिल्हा अहमदनगर शेवगांव पोलीस स्टेशन गु.र.नं. ४३/२०२२ भादवी कलम ३०७,३२४,१२०(ब)सह आर्मॲक्ट कलम ३(२५) या गुन्हयात गेल्या सहा महीन्यांन पासुन पहीजे आहे.**

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे, अपर पोलीस आयुक्त डॉ.श्री.संजय शिंदे, पोलीस उप आयुक्त डॉ.श्री. काकासाहेब डोळे, सहा.पोलीस आयुक्त डॉ.प्रशांत अमृतकर व पद्माकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय जोगदंड, सहा.पोलीस उप-निरीक्षक अशोक दुधवणे, सहा.पोलीस उप-निरीक्षक अमर राऊत, पोलीस अंमलदार सुनिल कानगुडे, रमेश मावसकर, किरण काटकर, निशांत काळे, अशिष बोटके, गणेश गिरीगोसावी, विजय नलगे, झ्रनेश्वर कुऱ्हाडे, सुधीर डोळस, शैलेश मगर, प्रदीप गायकवाड, प्रदिप गुट्टे यांचे पथकाने केली आहे.

(डॉ.काकासाहेब डोळे)
पोलीस उप-आयुक्त,
गुन्हे, पिंपरी-चिंचवड